# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२१

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### राज्यात नवीन महाविद्यालये सुरु करण्याबाबत

**(१) २९६ (१८-०३-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : दिनांक २० जुलै, २०१८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ४०५१९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नवीन महाविद्यालये सुरु करण्यासंदर्भातील बृहत आराखडा राज्यातील विविध विद्यापीठांकडून उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बृहत आराखड्यावर उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून कोणता निर्णय घेण्यात आला व त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे ?

**श्री.उदय सामंत (२९-०६-२०२१) :** (१), (२) व (३) हे अंशतः खरे आहे.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे सन २०२१-२०२२ या वर्षामध्ये सुरू करावयाच्या नवीन महाविद्यालयाच्या स्थळबिंदूस महाराष्ट्र राज्य उच्च

शिक्षण व विकास आयोगाची मान्यता घेण्याबाबतचे प्रस्ताव संबंधित विद्यापीठांकडून शासनास विलंबाने सादर करण्यात आलेले आहेत. त्यामुळे या प्रस्तावाबाबत विद्यापीठ अधिनियमात उल्लेखिलेल्या दिनांकास कार्यवाही होऊ शकली नाही.

सन २०२०-२०२१ या वर्षात स्थळबिंदूंना मान्यता देण्यासाठी विद्यापीठ अधिनियमातील नमूद दिनांकामध्ये आवश्यक ते बदल करून अध्यादेश प्रसिध्द करण्याची कार्यवाही सुरू आहे.

---

## राज्यातील नद्या प्रदूषित होत असल्याबाबत

**(२) १६८५ (१८-०३-२०२०) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ४६६०३ ला दिनांक २० जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५३ नद्यांची प्रदूषण पातळी धोकादायक असल्याचे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण बोर्डाच्या आकडेवारीनुसार स्पष्ट झाले असून सदरहू बाब राज्य शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नद्यांचे प्रदूषण कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबत आढावा घेण्यात आला आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (३०-०८-२०२१) :** (१) व (२) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये राज्याच्या राष्ट्रीय जलगुणवत्ता सनियंत्रण कार्यक्रमांतर्गत चालविण्यात येणाऱ्या प्रकल्पातील सन २०१६ ते २०१७ या कालावधीतील जलगुणवत्ता माहितीवर आधारित राज्यातील ५३ नद्या प्रदूषित म्हणून जाहीर केल्या आहेत. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आदेशानुसार ५३ प्रदूषित नद्यांचे कृती आराखडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तयार करून राष्ट्रीय हरित लवाद आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण

मंडळाला सादर केलेले आहेत. सदर कृती आराखड्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाव्दारे नद्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या बेस्ट विभागात कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याबाबत

**(३) १७५१ (१८-०३-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या बेस्ट विभागातील कर्मचाऱ्यांना अनियमित वेतन, रोष्टर पध्दतीच्या ड्युटीमुळे १२-१३ तास काम, कामाचा तणाव, सेवानिवृत्तीनंतर ग्रॅज्युटी वेळेवर न मिळणे इत्यादी कारणास्तव गत वर्षभरात १६५ बेस्ट कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार बेस्ट कर्मचाऱ्यांना नियमित वेतन तसेच अद्यावत सोयी सुविधा मिळण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-०८-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) बेस्ट उपक्रमातील सर्व सेवकवर्ग सदस्यांना नियमितपणे दरमहा वेतन प्रदान करण्यात येत आहे. तसेच सदर सेवकवर्ग सदस्यांच्या ग्रॅज्युटीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून निधी प्राप्त करण्याकरीता बेस्ट प्रशासनाकडून प्रयत्न सुरु असून, सदर निधी प्राप्त होताच ग्रॅज्युटीचे प्रदान करण्यात येणार आहे.

बेस्ट उपक्रमातील निवृत्त सेवकवर्ग सदस्यांकडून स्वत:च्या आजारपणाबद्दल, कौटुंबिक अथवा मुलगा/मुलगी यांच्या विवाहाबाबत अर्ज प्राप्त झाल्यास त्यांना ग्रॅज्युटीचे अंशत: प्रदान करण्यात येते.

तसेच, ग्रॅज्युटीची रक्कम न मिळाल्यामुळे निवृत्त बेस्ट कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्याबाबत कोणतीही तक्रार बेस्ट उपक्रमासमोर आलेली नाही.

याव्यतिरिक्त बेस्ट उपक्रमामधील बाहय वाहतूक कर्मचाऱ्यांकरीता तयार करण्यात आलेले कामाचे वेळापत्रक कारखाना कायदा, १९४८ अंतर्गत तयार करण्यात आलेले असून, सदर वेळापत्रकानुसार कामगारांना ८ तासांपेक्षा जास्त काम करावे लागणार नाही याची काळजी घेण्यात येते. परंतु उपक्रमाच्या कामाची निकड लक्षात घेता एखाद्या वेळेस जास्त तासांची ड्युटी करावी लागते त्यावेळी त्यांच्या दोन कामांमधील विश्रांतीचे अंतर कायद्याच्या अनुषंगाने राखले जाईल याची दक्षता घेतली जाते असे बेस्ट प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात रोजगार वाढविण्याबाबत

**(४) १८१३ (१८-०३-२०२०) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०११-२०१२ ते २०१७-२०१८ या सहा वर्षात १९ लाख बेरोजगार रोजगाराच्या प्रतिक्षेत असल्याचे अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर सस्टेनेबल एम्प्लॉयमेंट विभागामार्फत माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी क्षेत्रात रोजगारातील सर्वाधिक घट असून त्यानंतर बांधकामासह बिगर उत्पादन क्षेत्रात घट असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रोजगार वाढविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (२८-०७-२०२१) :** (१) सदर अहवाल विभागास प्राप्त झालेला नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अलिबाग (जि.रायगड) परिसरातील विद्‌युत वाहिन्या भूमिगत करण्याच्या कामाबाबत

**(५) १८१९ (१८-०३-२०२०) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण कार्यक्रमांतर्गत सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान अलिबाग (जि.रायगड) परिसरातील विद्‌युत वाहिन्या भूमिगत करण्याचा प्रकल्प शासनाकडून मंजूर करण्यात आला असून या प्रकल्पांतर्गत अलिबाग शहरातील विविध भागात भूमिगत विद्‌युत वाहिन्या टाकण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे कामाचे सर्वेक्षण लीना पॉवर या कंपनीकडून सुरू केले असून पावसाळा संपल्यावर काम सुरू करण्यात येईल असे विद्‌युत मंडळाचे सहायक अभियंता, अलिबाग-रायगड यांच्याकडून माहे जून, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान सांगण्यात आले होते परंतु सदरच्या कामास सुरूवात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जागतिक बँकेचे अर्थसहाय्य असलेला अलिबाग परिसरातील विद्‌युत वाहिन्या भूमिगत करण्याच्या प्रकल्पाला शासनाच्या अनास्थेमुळे विलंब झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पांतर्गत विद्‌युत वाहिन्या भूमिगत करण्याचे काम पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२६-०७-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. मे.लीना पॉवरटेक इं.प्रा.लि. यांना दिनांक १३ जून, २०१९ रोजी कार्यादेश देण्यात आलेला असून सदर प्रकल्पांतर्गत कामे प्रगतीपथावर आहेत. सदर प्रकल्पाची पूर्णत्वाची तारीख दिनांक ३१/०३/२०२१ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावित्रीबाई फुले विद्यापीठात पीएचडी अभ्यासक्रमासाठीच्या प्रवेश नियमांचे उल्लंघन झाल्याबाबत

**(६) १८५४ (१७-०३-२०२०) श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले विद्यापीठात सन २०१६ मध्ये पीएचडी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या २२ उमेदवारांना विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाने नियमांचे उल्लंघन करुन प्रवेश दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीएचडी प्रवेश घेताना पदवी किंवा पदव्युत्तर पदवीनंतर किमान दहा ते पंधरा वर्षाचा त्या क्षेत्रातील अनुभव त्या व्यक्तीकडे हवा असा नियम असताना उक्त प्रवेश प्रक्रियेत नियमाचे उल्लंघन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२९-०६-२०२१) :** (१) खरे नाही.

(२) खरे नाही.

(३) खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अनुदानास पात्र शाळांचा निधी वितरणाचा शासन आदेश निर्गमित करण्याबाबत

**(७) २८३१ (२८-०५-२०२०) श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ११०२ ला दिनांक ६ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी व्यवस्थापनाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजी अनुदानास पात्र म्हणून घोषित करण्यात आल्या असून सदर शाळांच्या अनुदानासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची तरतूद पूरक विवरण पत्रामध्ये अर्थसंकल्पीय अधिवेशनात करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनुदान वितरणाचा शासन आदेश निर्गमित न झाल्याने हे शिक्षक अजूनही वेतनापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील खाजगी व्यवस्थापनाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा वर्ग व तुकड्यांना अनुदान मिळण्यासाठी मुल्यांकन असून सदर मुल्यांकन केलेल्या शाळा व वर्ग तुकड्या क्षेत्रियस्तरावर तसेच मंत्रालयस्तरावर अनुदानास पात्र होण्यासाठी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खाजगी व्यवस्थापनाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्यांना अनुदानास पात्र म्हणून घोषित करून अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२४-०८-२०२१) :** (१) व (२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ मधील काही अटी ह्या जाचक असल्याचे विविध संघटना व शिक्षक प्रतिनिधी यांनी सदर अटी रद्द कराव्यात, अशी विनंती शासनास करण्यात आली. यानुषंगाने मा.मंत्री

(महसूल) यांचे अध्यक्षतेखाली गठित त्रुटी समितीच्या शिफारशी दिनांक १४/१०/२०२० रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत ठेवून, शासन निर्णय, दिनांक १३/९/२०१९ मधील काही अटी व शर्तीमध्ये शासन निर्णय, दिनांक ४/१२/२०२० अन्वये सुधारणा करण्यात आली.

त्यानुसार, पात्र शाळांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात येऊन, तपासणीत पात्र ठरलेल्या शाळांना दिनांक १२ फेब्रुवारी, २०२१ व १५ फेब्रुवारी, २०२१ अन्वये खाजगी प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना अनुदानास पात्र घोषित करुन, दिनांक १ नोव्हेंबर, २०२० पासून वाढीव २० टक्के अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

तसेच, शासन निर्णय, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२१ अन्वये २० टक्के अनुदानासाठी पात्र घोषित करण्यात आलेल्या मुंबई व कोल्हापूर विभागातील कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत सन २०२१ च्या पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागणी मंजूर करण्यात आली आहे.

(३) व (४) अंशत: खरे आहे. मुल्यांकन झालेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या प्रस्तावांची तपासणी आयुक्त (शिक्षण) यांचे स्तरावर होऊन, अनुदानास पात्र घोषित करण्यासाठी प्रस्ताव शासनास प्राप्त झालेले नाहीत. प्रस्ताव प्राप्त होताच वित्त विभागाच्या मान्यतेने सदर प्रकरणी कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरात शासकीय धान्याचा काळाबाजार होत असल्याबाबत

**(८) २८५४ (२८-०५-२०२०) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर, श्री.विनायकराव मेटे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात शासकीय धान्याचा काळाबाजार होत असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून अन्न व नागरी पुरवठा विभागाने यामध्ये संशयास्पद भूमिका घेवून चोरीचा गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मौदा (जि.नागपूर) तालुक्यात स्वस्त धान्य वाटप संकटात आल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून स्वस्त धान्य दुकानातुन मोफत धान्य मिळेल असे जाहीर केले असताना देखील सदरहू आदेशाची अंमलबजावणी केली जात नसून मौदा तालुक्यातील काही गावांमध्ये स्वस्त धान्य दुकानदार मनमानी कारभार करुन धान्य वाटपात गैरव्यवहार, धान्य कमी देणे, साठा असताना देखील धान्य संपल्याचे सांगुन ग्राहकांना घरी पाठविणे इत्यादी बाबी करीत असल्याने याबाबत तक्रारी करुनही कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोरोना महामारीच्या संकटावर मात करण्याकरीता लॉकडाऊनच्या काळात कुठलाही शिधापत्रिकाधारक धान्यापासून वंचित राहणार नाही असे जिल्हा प्रशासनाचे स्पष्ट आदेश असूनही नागपूर शहरात अनेक ठिकाणी शिधापत्रिकाधारक धान्यासाठी भटकत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये निदर्शनास आले, तसेच, अंत्योदय शिधापत्रिकाधारक आणि प्राधान्य शिधापत्रिकाधारकांनाही दोन रुपये किलो दरात गहू व तीन रुपये किलो दरात तांदूळ अशाप्रकारच्या योजना शासन राबवित असताना देखील प्रशासनामधील काही लोक गरीबांच्या नावावर आलेले स्वस्त धान्य त्यांच्यापर्यंत पोहचू देत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कंटेनमेन्ट झोनमधील स्वस्त धान्य दुकानातील कार्डधारकांना दुसऱ्या कोणत्या भागातून धान्य मिळेल याची कुठलीही नोटीस जिल्हा पुरवठा कार्यालयाने न लावल्याने रोज मोठ्या संख्येत नागरिक निराश होवून परत जात असून अनेक नागरिकांना शिविगाळही करण्यात येत असल्याच्या तक्रारी जिल्हा प्रशासनाकडे आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, ४०१ मेट्रीक टन तुरडाळ व ४५१ मेट्रीक टन चनाडाळ जिल्हा प्रशासनाकडे उपलब्ध झाली असून स्वस्त धान्य दुकानदार महसूल अधिकाऱ्यांच्या संगनमताने घरातील सर्व माणसांची नावे शिधापत्रिकेवर असताना देखील तुमच्या घरातील सर्व माणसांचा धान्य आला नाही असे सांगून अर्धेच धान्य लाभार्थ्यांना देवून हाच अर्धे धान्य स्वस्त धान्य दुकानदार काळया बाजारात जास्त दराने विकत असून यामध्ये मोठे दलाल, महसूल विभागातील अधिकारी यांचा सहभाग आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धान्याचा होणारा काळाबाजार रोखण्यासंबंधी कार्यवाही करुन अन्न व प्रशासन विभागाच्या आदेशाची अंमलबजावणी न करणाऱ्यासह स्वस्त धान्य दुकानदारांवर तसेच संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (०१-०७-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर रास्त भाव दुकानदारांमार्फत धान्याचे वाटप योग्यरित्या व्हावे याकरीता भरारी पथक तयार करण्यात आले आहे. सदर भरारी पथकामार्फत रास्त भाव दुकानांच्या तपासण्या करण्यात आल्या असून १३ रास्त भाव दुकानदारांना सक्त ताकीद देऊन रुपये १३,०००/- अनामत रक्कम शासन जमा करण्यात आली आहे. तसेच १ रास्त भाव दुकान निलंबित करण्यात आले आहे. प्रत्येक रास्त भाव दुकानामध्ये ग्राहकमित्र नियुक्त करण्यात आले असून दर्शनी भागी धान्याची किंमत, धान्याचे परिमाण यांचे फलक लावण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही. अंत्योदय व प्राधान्य गट लाभार्थ्यांना दरमहा विहित परिमाणात धान्यांचे वितरण करण्यात आले आहे.

(४) हे खरे नाही. या झोनमधील सर्व रास्त भाव दुकानदारांना अवगत करण्यात आले होते व त्यांना पुरेसा धान्यसाठा उपलब्ध करुन देण्यात आला होता. तसेच, रास्त भाव दुकानदारांना पोर्टबिलिटीव्दारे अन्नधान्य वितरण करण्याचे निदेश देण्यात आले आहेत.

(५) हे खरे नाही. डाळींचे नियतन प्रति शिधापत्रिका १ किलो या परिमाणात होते, व्यक्तीसंख्येनुसार नाही. पॉस मधील व्यक्तीसंख्येनुसारच धान्यांचे वितरण शिधापत्रिकाधारकांना करण्यात आले आहे.

(६) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अन्नधान्य वितरण अधिकारी नागपूर येथील कार्यालय पथकाने ८० रास्त भाव दुकानाच्या तपासण्या केल्या असून दोष आढळलेल्या ३ दुकानांचे प्राधिकारपत्र रद्द करण्यात आले आहे. ५ दुकाने निलंबित करण्यात आली आहेत. एका दुकानाविरुध्द जीवनावश्यक वस्तु अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून ५२ प्रकरणात रास्तभाव दुकानाची संपूर्ण अनामत रक्कम शासन जमा करण्यात आली आहे.

---

## फॉरेन्सीक सायन्स पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या अडचणीबाबत

**(९) २९३१ (२९-०५-२०२०) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात न्याय सहाय्यक विज्ञान (फॉरेन्सीक सायन्स) या क्षेत्रात मनुष्यबळ तयार करणे हा उद्देश ठेवून दिनांक ३० मार्च, २००९ रोजीच्या शासन आदेशान्वये मुंबई, नागपूर व औरंगाबाद येथे शासकीय न्याय सहाय्यक विज्ञान संस्था सुरु करण्यात आले असून या तिन्ही संस्थामधून चार हजार विद्यार्थीनी पदव्या घेतल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फॉरेन्सीक सायन्समध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षणानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणांशी संबंधित क्षेत्रात रोजगार उपलब्ध होत नसल्याने विद्यार्थ्यांच्या अडचणीबाबत दिनांक १६/०७/२०१९ रोजी अप्पर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन कार्यवाही करण्याचे ठरले परंतु त्यावर निर्णय झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील फॉरेन्सिक लॅबमध्ये वर्ग-१ ची ६४ टक्के आणि वर्ग-२ ची ९६ टक्के पदे रिक्त असल्याचे प्रजा फांऊडेशनने केलेल्या सर्वेक्षणातून माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१९-०७-२०२०) :** (१) मुंबई, औरंगाबाद व नागपूर येथे स्थापन करण्यात आलेल्या शासकीय न्याय सहायक विज्ञान संस्थांमधून आतापर्यंत पदवी (बी.एस्सी फॉरेन्सीक सायन्स) चे एकूण ८८८ आणि पदव्युत्तर पदवी (एम.एस्सी फॉरेन्सीक सायन्स) चे एकूण ३०३ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत.

(२) नाही. न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयातील विविध संवर्गातील सुधारीत सेवाप्रवेश नियमाच्या प्रस्तावामध्ये न्याय सहायक विज्ञान या विषयातील पदवीचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच, विभागामार्फत न्याय सहायक वैज्ञानिक संस्थेच्या पदव्या संचालनालयातील विविध संवर्गातील पदासाठी आणि हस्ताक्षर व छायाचित्रण विभागातील सहायक शासकीय हस्तऐवज परिक्षक या पदाकरीताच्या शैक्षणिक अर्हतेस समकक्ष म्हणुन ग्राह्य धरण्यात आलेल्या आहेत. या व्यतिरिक्त बैठकीतील इतर मुद्यांबाबत न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय व न्याय सहायक विज्ञान संस्था यांचे समन्वयाने पुढील आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) होय. संचालनालयातील वर्ग-१ व वर्ग-२ ची रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेने भरण्यात येत असून संचालनालयातील उर्वरित सरळसेवा कोट्यातील रिक्त पदे भरणेबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जात प्रमाणपत्र पडताळणीचे उपायुक्त व दक्षता पथक प्रमुख यांनी गैरप्रकार केल्याबाबत

**(१०) २९९८ (२८-०५-२०२०) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे** : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली विभागीय जात पडताळणीचे उपायुक्त श्रीमती छाया कुलाल व लातुर विभागीय जात पडताळणी दक्षता पथकाचे प्रमुख श्री. एस.एस. केंद्रे यांनी जात प्रमाणपत्र वाटपात केलेले गैरप्रकार व अवैध ठरवलेले प्रस्ताव यासाठी प्रचंड आर्थिक लुट केल्यावरून त्यांच्या काळातील देण्यात आलेली सर्व प्रमाणपत्र तसेच अवैध ठरवलेले प्रस्ताव यांची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान प्रधान सचिव, सामाजिक न्याय यांच्याकडे लेखी तक्रार नोंदविली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीमती कुलाल व श्री.कैंद्रे यांच्या काळात देण्यात आलेली सर्व प्रमाणपत्र तसेच फेटाळण्यात आलेले व अवैध ठरवलेले प्रस्ताव या सर्वांची वरिष्ठस्तरावरून चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार शासनाने दोषींविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१५-०२-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी शासनाने महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातींचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२, मधील तरतूदींनुसार पोटनियम मधील २५(४) नुसार चौकशी करण्यासाठी आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(३) या प्रकरणी आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्याकडून शासनास अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिखलोली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) गावातील आदिवासींच्या वाट्याचे धान्य काळाबाजारात विक्री केल्याबाबत

**(११) ३०८५ (२८-०५-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखलोली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) गावातील रामदास भागा धोंडे हा स्वस्त धान्य दुकानदार आदिवासींचे धान्य काळाबाजारात विक्री करीत असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी लाभार्थ्यांनी याप्रकरणी अंबरनाथ तहसिल कार्यालयात मदत मागण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने या काळाबाजारात अंबरनाथ तहसिल, प्रांत कार्यालय आणि जिल्हा पुरवठा शाखा सहभागी असल्याचा आरोप लाभार्थ्यांनी केला असून यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (०१-०७-२०२१) :** (१) आदिवासींचे धान्य काळाबाजारात विक्री केल्याची बाब खरी नाही, तथापि, सदर स्वस्त धान्य दुकानदाराविरुध्द माहे मे, २०२० मध्ये तक्रार प्राप्त झाली आहे.
(२) हे खरे नाही, मौजे चिखलोली, ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथील आदिवासी लाभार्थ्यांनी या प्रकरणी अंबरनाथ तहसिलदार कार्यालयात मदत मागण्याचा प्रयत्न केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) सदर रास्त भाव दुकानदाराविरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन दुकान निलंबित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी उपजीविकेसाठी गोळा करीत असलेल्या वन उत्पादनांच्या खरेदीबाबत

**(१२) ३२१४ (०२-०६-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी आपल्या उपजीविकेसाठी वन उत्पादने म्हणजेच महू, चारोळी, डिंक, तेंदूपत्ता, बेहडा गोळा करून त्यावर प्रक्रिया आणि विक्री केली जाते परंतु सध्या संचारबंदीमुळे ही संपूर्ण प्रक्रिया बंद असून युनिसेफ आणि ट्रायफेड यांनी आदिवासी क्षेत्रातील वन उत्पादने गोळा करणाऱ्या

आदिवासींना सामाजिक अंतराची माहिती देऊन सुरक्षितरित्या वनउपज गोळा करण्याच्या पध्दतीचे प्रशिक्षण देण्यासंदर्भात माहिती दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यामध्ये वनधन केंद्रांना निधी उपलब्ध न झाल्याने दलाल वर्ग आदिवासींचे शोषण करतात, गोळा झालेली तुटपुंजी व उत्पादने कवडीमोलाने विकली जात असल्यामुळे आदिवासींच्या उपजीविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याची बाब दिनांक ११ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वनधन केंद्रांनाच वन उत्पादने खरेदी करण्याची मान्यता द्यावी अशी मागणी संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासींच्या उपजीविकेचा प्रश्न सोडविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**अॅड. के.सी.पाडवी (२३-०३-२०२१) :** (१) होय.

गृह मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक १६ एप्रिल, २०२० रोजीच्या पत्रान्वये राज्यातील आदिवासींच्या उपजिविकेसाठी गौणउपज गोळा करणे, प्रक्रिया करणे इत्यादीबाबत मान्यता दिलेली आहे. युनिसेफ व ट्रायफेड, नवी दिल्ली यांनी देशपातळीवर दिनांक १३ एप्रिल, २०२० रोजी व राज्यस्तरावर दिनांक १५ एप्रिल, २०२० रोजी आदिवासींना सामाजिक अंतराची माहिती देऊन सुरक्षितरित्या वनउपज गोळा करण्याच्या पध्दतीचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) २० वनधन केंद्रांना प्रत्येकी रुपये ५ लक्ष प्रमाणे एकूण रक्कम रुपये १ कोटी निधी उपलब्ध करुन दिला आहे. १६ वनधन केंद्रांना वनधन केंद्रांना निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद येथे बालगृहांना लॉकडॉऊनमध्ये धान्य पुरवठा करण्याबाबत

**(१३) ३२२४ (०२-०६-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे अनाथ व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांच्या १६ बालगृहांना पुरवठा विभागाकडून गहु, तांदुळ व इतर धान्य पुरविले जाते, परंतु लॉकडाऊनमध्ये या बालगृहांना धान्य पुरवठा झाला नसल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार बालगृहांना धान्याचा पुरवठा होण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (१६-०२-२०२१) :** (१) व (२) औरंगाबाद जिल्हयात शासकीय व शासन अनुदानित कल्याणकारी संस्थाना शासनाकडून दिनांक २१/०५/२०२० च्या पत्रान्वये माहे एप्रिल, २०२० ते सप्टेंबर, २०२० करीता नियतन उपलब्ध करून देण्यात आले आहे. औरंगाबाद जिल्हयातील बालगृहांपैकी ६ बालगृहांना त्यांच्या मागणीनुसार ४०.९४ क्विंटल गहू व २७.०१ क्विंटल तांदूळ क्षेत्रिय कार्यालयाकडून वितरित करण्यात आला आहे. उर्वरीत बालगृहांकडून अन्नधान्याची मागणी क्षेत्रिय कार्यालयाकडे नोंदविण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद येथे स्वस्त धान्य दुकानांमध्ये काळाबाजार होत असल्याबाबत

**(१४) ३३१५ (०२-०६-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील स्वस्त धान्य दुकानदार शिधापत्रिकेप्रमाणे मंजूर असलेल्या धान्यापैकी २ ते ३ किलो धान्य ग्राहकांना कमी देवून त्या धान्याचे दरही २ ते ४ रुपयांनी वाढवून त्याची विक्री करीत असून धान्याची पावतीही

कोणत्याच ग्राहकाला देण्यात येत नसल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (०१-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर रास्तभाव दुकानदाराची चौकशी करुन नियमानुसार कारवाई करण्यात येते. त्यानुषंगाने जिल्ह्यातील १४ रास्तभाव दुकानांचे प्राधिकारपत्र निलंबित करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील विशेष शाळेतील शिक्षकांच्या समाजकल्याण विभागात पूर्णवेळ अधिकारी व कर्मचारी मिळणेबाबत

**(१५) ३३५३ (२८-०५-२०२०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील विशेष शाळेतील अंध, कर्णबधीर व अपंग शाळेतील शिक्षकांच्या समाजकल्याण विभागात एक अधिकारी मुंबई शहर, मुंबई उपनगर व जात पडताळणी असे तीन विभागाचे काम पहात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विभागाला पूर्णवेळ अधिकारी व कर्मचारी नसल्यामुळे शिक्षक/शिक्षकेतर सेवानिवृत्त होऊनही दोन-दोन वर्षे झाली असून तरी त्यांना पेन्शन, ग्रॅज्युटी मिळत नाही, तसेच सेवानिवृत्तिनंतर पेन्शन व इतर फायदयांसाठी त्यांना वारंवार समाजकल्याण विभागाकडे विचारणा करावी लागत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर विभागाला पूर्णवेळ अधिकारी व कर्मचारी मिळण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०९-०८-२०२१) :** (१) समाजकल्याण अधिकारी, बृहन्मुंबई यांच्याकडे सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, मुंबई शहर व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, मुंबई उपनगर या पदांचा अतिरिक्त कार्यभार असून मुंबई शहर व मुंबई उपनगर येथील जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांच्या संशोधन अधिकारी पदांवर स्वतंत्र अधिकारी कार्यरत आहेत.

(२) मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्ह्यांमध्ये दिव्यांगाकरीता अनुक्रमे २६ व २७ अनुदानित शाळा/कर्मशाळा आहेत. मुंबई शहर येथील ५६ सेवानिवृत्तीचे प्रस्ताव प्रलंबित होते. पैकी ४२ प्रस्ताव मंजूर झाले असून ५ प्रस्ताव अधिदान व लेखा अधिकारी व ५ प्रस्ताव महालेखाकार कार्यालयास सादर केलेले आहेत. मुंबई उपनगर येथे मार्च, २०२० ते मे, २०२० या कालावधीत ८ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यानुषंगाने सदर कार्यालयामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) व (४) प्रस्तुत सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण संवर्गातील रिक्त पदे पदोन्नती तसेच सरळसेवेने भरण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## राज्यातील दहापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांबाबत

**(१६) ३३९९ (०२-०६-२०२०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोविड १९ च्या विषाणूमुळे देशात आणि राज्यात संपूर्ण लॉकडाऊन लागू झाल्याने राज्यातील दहापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करू नये अशी मागणी शिक्षक भारती संघटना तसेच पालक, विद्यार्थी व शिक्षक यांच्याकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२६-०७-२०२१) :** (१) व (२) यासंदर्भातील निवेदन प्राप्त झाले आहे. तथापि, सद्य:स्थितीत अशा शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आलेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अपंग शाळेत सफाई कामगार, काळजीवाहक व पहारेकरी ही पदे पूर्ण वेळ भरणेबाबत

**(१७) ३४७६ (२८-०५-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४७७३७ ला दिनांक २८ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंग शाळेत सफाई कामगार, काळजीवाहक व पहारेकरी ही पदे कंत्राटी पध्दतीवर कामकाज करण्यास तयार नसल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सफाई कामगार, काळजीवाहक व पहारेकरी ही पदे पूर्ण वेतनावर नेमण्याची मागणी शाळा व्यवस्थापनाकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील पदाना नियमित वेतनश्रेणी देण्याबाबत शासनस्तरावर सुरू असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१३-०१-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.

(३) व (४) उक्त प्रकरणी शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कुटूंबातील रक्ताच्या नात्यातील व्यक्तींना जात प्रमाणपत्र देण्याबाबत

**(१८) ३४८५ (२८-०५-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४५० ला दिनांक १६ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुटूंबातील एका व्यक्तीला जात प्रमाणपत्र मिळाल्यानंतर त्या आधारे त्याच कुटूंबातील त्याच्या रक्ताच्या नात्यातील व्यक्तींना जात प्रमाणपत्र देण्याबाबतचे शासनाने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास आदेश निर्गमित केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची अंमलबजावणी राज्यात सुरु झाली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१५-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

जात प्रमाणपत्र देण्याचे काम हे संबंधित उपविभागीय अधिकारी (महसूल) यांचेस्तरावरुन केले जाते. तथापि, सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार जात वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते.

(२) होय.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासकीय आश्रमशाळेतील शिक्षकांच्या सराव परिक्षेच्या निमित्ताने वेतनवाढी रोखल्याबाबत

**(१९) ३५४२ (०२-०६-२०२०) डॉ.रणजित पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ११२६ ला दिनांक २ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा प्रकल्पातील शासकीय आश्रमशाळेतील ४८ शिक्षकांच्या तीन सराव परीक्षा आयोजित करुन केवळ एकाच सराव परिक्षेच्या निकालावर सर्व माध्यमिक शिक्षकांच्या वेतनवाढी रोखण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपर आयुक्त, अमरावती यांच्याकडे शिक्षकांनी अपील करुन सहा महिन्यांचा कालावधी होऊनही सुनावणी झाली नसून पुर्वीच्या प्रकल्प अधिकाऱ्यांनी शिक्षकांबद्दल सकारात्मक अहवाल पाठवून सुध्दा पुनश्च शिक्षकांच्या मागील ५ वर्षाचे निकाल मागविणे आणि त्यांच्या परीक्षा घेणे यामध्ये वेळ वाया घालवणे सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी अपर आयुक्त स्तरावर ४८ शिक्षकांना वैयक्तिक सुनावणी देऊन अपिले निकाली काढण्याची सुरु करण्यात येत आलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त ४८ शिक्षकांना वैयक्तिक सुनावणी देऊन अपिले निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२१-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) दिनांक २४/०८/२०२० रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली असून रोखण्यात आलेल्या वेतनवाढी नियमित लागू करणेबाबत आदेश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कांदिवली (प.), मुंबई येथील कांदळवनातील तिवरांची झाडे तोडून बेकायदा बांधकाम केल्याबाबत

**(२०) ३७२८ (०२-०६-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कांदिवली (प.), मुंबई येथील कांदळवनातील तिवरांची झाडे तोडून भराव टाकुन करण्यात येत असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका व महसूल विभागाच्या मदतीने माहे मे, २०१६ ते

आजतमितीपर्यंत एकूण ७ वेळा निष्कासनाची कारवाई करण्यात आली असून सदर कारवाईत १४१ निवासी, ३६६ कच्ची व ७८ अनिवासी अशी एकूण ५८५ बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कांदिवली (प.) सह मुंबई उपनगरातील कांदळवनातील तिवरांची झाडे तोडून भराव टाकून करण्यात येत असलेली बेकायदा बांधकामे रोखण्यासाठी आणि सदर भूभाग कायमस्वरुपी अतिक्रमण मुक्त राहण्यासाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना हाती घेण्यात आल्या वा येत आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार मुंबई उपनगरातील कांदळवनातील तिवरांची झाडे तोडून भराव टाकून करण्यात येत असलेली बेकायदा बांधकामे रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उध्दव ठाकरे (२१-१२-२०२०) :** (१) मौजे चारकोप येथील अनधिकृत अतिक्रमणाविरुध्द चौकशी करुन बृहन्मुंबई महानगरपालिका, महसूल विभाग व पोलीस विभाग यांनी केलेल्या संयुक्त कारवाई मध्ये दिनांक २४/०४/२०१७ रोजी २१६ अनधिकृत अतिक्रमणे, दिनांक १८/०४/२०१८ रोजी १८० अनधिकृत अतिक्रमणे व २ अनधिकृत धार्मिक स्थळे व २ अनधिकृत तबेले तसेच दिनांक १२/०७/२०१९ रोजी २६ अतिक्रमणे अशी एकूण ४२६ अनधिकृत अतिक्रमणे निष्कासित करण्यात आलेली आहेत.

कांदिवली पश्चिम चारकोप येथील सर्व्हे क्र. ३८ व ३९ येथे सन २०१६ ते आजपर्यंत दोन वेळा तहसिलदार, बोरीवली यांच्याकडून निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली आहे. कांदळवनापासून ५० मीटरच्या आत असलेल्या एकूण ३७५ अनधिकृत झोपड्यांचे सन २०१७ साली तसेच २९० अनधिकृत झोपड्यांचे सन २०१९ साली निष्कासन करण्यात आले आहे.
(२) व (३) कांदळवनाचा ऱ्हास केल्याप्रकरणी पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ कायद्यांतर्गत दोषीविरुध्द प्रकरणी तहसिलदार, बोरीवली यांच्याकडून गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. कांदळवनापासून ५० मीटरच्या आत असलेल्या बांधकामे/झोपड्यांच्या निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली आहे.

मौजे कांदिवली (प.) मुंबई सर्व्हे क्र. १४९ न.भु.क्र. १/ब मधील अनधिकृत अतिक्रमणाविरुध्द कार्यवाही करुन संवेदनशील कांदळवन क्षेत्राभोवती २२५ र.मी. लांबीची संरक्षक भिंत सन २०१९ बांधण्यात आलेली आहे. उर्वरित क्षेत्राभोवती संरक्षक भिंत बांधणे प्रस्तावित असून सदर क्षेत्रात अतिक्रमण होऊ नये म्हणून वन अधिकारी व कर्मचारी नियमित गस्त घालत आहेत. तसेच नमूद क्षेत्रात जानेवारी, २०१७ पासून एक सुरक्षा चौकी कार्यरत असून १९ सुरक्षा कर्मचारी तैनात केलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दप्तर दिरंगाई कायद्यातील तरतुदीनुसार शिक्षण विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचेविरूध्द कारवाई करण्याबाबत

**(२१) ३८५० (१६-०७-२०२०) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दप्तर दिरंगाई कायद्यातील तरतुदी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना लागू आहेत काय, तसेच दप्तर दिरंगाई कायद्यातील तरतुदीनुसार आपले कर्तव्य व जबाबदारी पार न पाडणाऱ्या शिक्षण विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचेविरूध्द कठोर स्वरूपाची दंडात्मक कारवाई करण्याबाबत नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मुख्य सचिव, अप्पर मुख्य सचिव, शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालक (प्राथ/माध्य) यांना पाठवून दोषी अधिकाऱ्यांविरूध्द कठोर स्वरूपाची दंडात्मक कारवाई करण्याची मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (३०-०६-२०२१) :** (१) अशा आशयाचे निवेदन विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांना प्राप्त झाले, हे खरे आहे.

(२) व (३) याबाबत शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार विहित कालावधीत कार्यवाही करण्याबाबत अन्यथा सदर अधिनियमातील कलम १०(३) नुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारच्या सूचना शासन परिपत्रक, दिनांक ०९/०६/२०२० अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

---

## मुंबई महानगरपालिकेने कोविडने मृत्यूमुखी पडलेल्या मुस्लिम रुग्णांचे मृतदेह पीएफआय संघटनेला देण्याचा आदेश काढल्याबाबत

**(२२) ३९१४ (३१-०७-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने कोविडने मृत्यूमुखी पडलेल्या मुस्लिम रुग्णांचे मृतदेह देशाविरोधी व समाजाविरोधी कारवाया केल्याचा आरोप असलेल्या 'पीएफआय' या संघटनेला देण्याचा आदेश काढला असून तो त्वरीत रद्द करण्यात यावा अशा आशयाची मागणी मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी एका लेखी निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडे माहे जून, २०२० च्या पहिल्या आठवड्यात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केरळ, कर्नाटक आणि उत्तरप्रदेश या राज्यांनी सदरहू संघटनेला प्रतिबंधित करण्याची कारवाई यापूर्वीच केली असून सीएचएच्या दरम्यान देशभरात ज्या दंगली उसळल्या त्यासाठी या संघटनेने पैसे पुरविलेल्यामुळे ईडीने या संघटनेची बँक खाती सील केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पीएफआय संघटनेला कोविडने मृत्यूमुखी पडलेल्या मुस्लिम रुग्णांचे मृतदेह देण्याबाबत आदेश काढण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच मुंबई महानगरपालिकेने सदर संघटनेला दिलेली परवानगी त्वरीत रद्द करण्याचे दृष्टीने शासनाने त्वरित निर्णय घेवून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३०-०८-२०२१) :** (१) अशा आशयाचे मागणी पत्र प्राप्त झालेले नाही.

तथापि, मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी ट्विटरवर केलेल्या टिपणीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांनी पोलीस आयुक्त, मुंबई यांना दिनांक १८/०६/२०२० रोजीच्या पत्राव्दारे पीएफआय या संस्थेवर समाजविघातक कार्यात समावेश असल्याबाबत किंवा त्यांचेवर काही गुन्हे प्रलंबित आहेत काय याबाबत अहवाल पाठविण्याची विनंती केली होती.

(२) माहे डिसेंबर, २०२० मध्ये भारतातील एकूण ९ राज्यांमध्ये २९ ठिकाणी पीएफआयच्या कार्यालयांवर तसेच पदाधिकाऱ्यांच्या निवासस्थानांवर ईडीमार्फत छापे टाकण्यात आले होते. सदर छाप्यांमध्ये पीएफआय आक्षेपार्ह हालचालींच्या अनुषंगाने उपयुक्त कागदपत्रे सापडल्याचे समजते असे अपर पोलीस आयुक्त (विशेष शाखा), मुंबई यांनी कळविले आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कोविड-१९ मुळे मृत पावलेल्या मुस्लिम धर्मियांच्या मृतदेहांचे सन्मानपूर्वक दफन करण्याच्या दृष्टीने "पीएफआय" या संस्थेची नेमणूक करण्यात आली होती.

तथापि, पीएफआय ही संस्था समाजविघातक कार्यात सामील असल्यामुळे, सदर संघटनेच्या कार्यकर्त्यांवर वेळोवेळी गुन्हे दाखल केल्याबाबतची माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेस माहे एप्रिल, २०२१ मध्ये प्राप्त झाली आहे.

त्यानुषंगाने पीएफआय या संस्थेला स्मशानभूमीमधील दहन आणि दफन या संबंधातले कोणत्याही प्रकारचे काम करण्यास परवानगी देण्यात येऊ नये असे आदेश महानगरपालिकेच्या सर्व विभागीय अधिकारी यांना दिनांक २२/०४/२०२१ रोजीच्या परिपत्रकाव्दारे देण्यात आले आहेत.

---

## अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळातील शिक्षकांच्या विविध प्रश्नांबाबत

**(२३) ३९४८ (१५-०७-२०२०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाप्रमाणेच विशेष शाळांचे वार्षिक वेळापत्रक, कामाचे दिवस व तास, सुट्टयांचे नियोजन आणि दैनंदिन वेळापत्रक, वेतनप्रणाली शालार्थ ऐवजी सेवार्थमध्ये हस्तांतरीत करणे, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा वाढवाव्यात, पदवीधर शिक्षक, कला क्रीडा शिक्षक यांना पदवीधर वेतनश्रेणी लागू करणे, पदोन्नतीने मुख्याध्यापक पदी नियुक्ती करणे या मागण्या शिक्षक भारती विशेष शाळा व कर्मशाळा विभागाचे अध्यक्ष श्री.विजय साबळे यांनी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच, सर्व अपंगांच्या शाळांच्या परवान्याचे नुतनीकरण करण्याच्या मागणीबाबत कार्यवाही न केल्यामुळे अनेक संस्था शाळा बंद करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०४-०८-२०२१) :** (१) नाही.
(२) नाही.

आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांच्या स्तरावरील दिव्यांग शाळांच्या परवान्याचे नुतनीकरणाचे प्राप्त प्रस्ताव तातडीने निकाली काढण्यात आले आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात बोगस व वाढीव दराने बियाणे व खतांची विक्री करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत

**(२४) ३९६४ (१६-०७-२०२०) श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विनायकराव मेटे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना संकटानंतर ऐन पेरणीच्या हंगामात राज्यातील विशेषत: मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र व कोकण विभागातील शेतकऱ्यांना वेळेवर बी-बियाणे व खते न मिळणे, शेतकऱ्यांना देण्यात आलेले बी-बियाणे बोगस असल्याने दुबार पेरणीची वेळ येणे, तसेच साठेबाजी होत असल्याने चढ्या भावात बियाणे व खतांची विक्री होत असल्याने शेतकरी मान्सूनच्या खरीप हंगामात संकटात सापडला असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने अनुदान थांबविल्याने महाबीजने वाढीव दराने बियाणांची विक्री करीत असणे, महाबीजने सोयाबीनची ३० किलोची एक बियाणांची बॅग रुपये १७०० ऐवजी रुपये २३०० वाढीव किंमतीत विकूनही सदरहू बियाणे बोगस निघाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक झाली असणे, याप्रकरणी दोषींवर कारवाई करण्याची मागणी मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी मा.मुख्यमंत्र्यांकडे पत्रव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्ह्यात सोयाबीन बियाणे उगवण न झाल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी शासनाकडे केल्या आहे, तसेच हिंगणघाट (जि.वर्धा) येथील एका कृषी केंद्रावर रुपये ३ लाख ४३ हजाराचे बोगस खत कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी धाड टाकूण जप्त केल्याचे दिनांक २२ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, तर औरंगाबाद येथील जाधववाडीतील नवभारत फर्टिलायझरमध्ये असलेल्या खताचा चढ्या भावाने विक्री करीत असल्याचा प्रकार मा.कृषी मंत्री यांनी स्टिंग ऑपरेशन करून निदर्शनास आणला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मराठवाड्यात विविध खत कंपन्यांनी केलेल्या बोगस खत उत्पादनामुळे जवळपास ३३० शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत ठरलेल्या त्या कंपनीविरूध्द गुन्हे नोंदविण्यासोबतच नुकसान भरपाई वसुल करून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटूंबियांचे पुनर्वसन करण्याबाबतची मागणी सामाजिक कार्येकर्ते परभणी यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे केली असून बोगस खत उत्पादक कंपन्या व त्यांचे संचालक यांच्यावर शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत ठरल्याचा आक्षेप विभागीय आयुक्त यांनी नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बोगस व वाढीव दराने बियाणे व खतांची विक्री करणाऱ्या कंपन्या/संचालक/वितरण/कृषी केंद्र/विक्रेता या संबंधित दोषींवर कारवाई करुन शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे व माफक दरात बियाणे व खते उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१९-०७-२०२१)** : (१) राज्यात खरीप हंगाम २०२० मध्ये शेतकऱ्यांना बियाणे व खते मिळत नसल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त नाहीत. तथापि, या वर्षी सोयाबीन बियाणांच्या उगवणशक्ती कमी असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.
(२) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे यासंदर्भातील निवेदन प्राप्त झालेले आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) बीड जिल्ह्यामध्ये सोयाबीन बियाणे उगवण न झाल्याच्या १०६५६ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या सर्व तक्रारीची प्रत्यक्ष क्षेत्रिय पाहणी करुन शेतकऱ्यांना अहवाल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. एकूण २९ शेतकऱ्यांना ४१.४० क्विटल बियाणे व ३१५ शेतकऱ्यांचा रुपये २१,३८,५५०/- इतकी रक्कम मदत म्हणून अदा करण्यात आली असून उर्वरीत शेतकऱ्यांस मदत देण्याची कार्यवाही सुरु आहे.

राज्यात खाजगी सोयाबीन उत्पादक कंपन्यांनी आजपर्यंत ४८०३ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली असून त्यापैकी १०८१ शेतकऱ्यांना १०६८.५९ क्विंटल बियाणे बदलून दिले व ३७२२ शेतकऱ्यांना रक्कम रुपये २,४६,१०,७३३/- इतकी नुकसान भरपाई म्हणून देण्यात आली आहे. उर्वरीत शेतकऱ्यांना मदत देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

बियाणे नियम १९६८ च्या नियम २३ अे अन्वये प्रत्यक्ष क्षेत्रावर प्राप्त तक्रारीनुसार उगवणशक्ती न झालेल्या प्रकरणात संबंधित दोषी कंपन्यांवर १८३ न्यायालयीन दावे दाखल केले असून अप्रमाणित नमुन्यांच्या ९८९ न्यायालयीन दावे दाखल करण्यात आलेले आहेत. सोयाबीन बियाणे

उगवणक्षमतेच्या तक्रारीच्या अनुषंगाने एकूण २० कंपन्यांचे सोयाबीन बियाणे विक्री परवाने रद्द करण्यात आले आहेत.

मराठवाडा विभागात एकूण १२ खत कंपन्यांच्या नमुन्यांची तपासणी करुन अप्रमाणित आढळून आलेल्या खत नमुन्याच्या अनुषंगाने माहे मार्च, २०२० पर्यंत २७ पोलीस गुन्हे दाखल केलेले आहेत. तसेच कृषी आयुक्तालय स्तरावरुन ३ विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. तसेच उर्वरित ९ प्रकरणी व्दितीय पुनर्विश्लेषणाची संधी देवून व पोलीस गुन्ह्याच्या अनुषंगाने होणाऱ्या न्यायनिर्णयाचे अधिन राहून ९ विक्रेत्यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे. तसेच राज्यात माहे जुलै, २०२० अखेर १८ पोलीस गुन्हे दाखल केलेले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आष्टी, पाटोदा व शिरूर (कासार) तालुक्यातील (जि.बीड) विद्युत पोल व तारांच्या दुरुस्तीबाबत

**(२५) ४२११ (१५-०७-२०२०) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी, पाटोदा व शिरूर (कासार) तालुक्यातील (जि.बीड) सर्व गावांतील विद्युत पुरवठा करणाऱ्या सडलेल्या वाहिन्या, गंजलेले पोल, ५० वर्षापुर्वीचे डी.पी. व लोंबकळणाऱ्या विद्युत वाहिन्यांमुळे माणसे व जनावरांच्या जिवितहानीच्या घटना वारंवार घडत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे ५० वर्षापुर्वीचे डी.पी. व लोंबकळणाऱ्या वीज वाहिन्या विनाविलंब बदलण्यात याव्यात म्हणून नागरिकांची व लोकप्रतिनिधींची वर्षानुवर्षे महावितरणकडे मागणी असतानाही महावितरणकडून दुर्लक्ष झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पोल, जुने डी.पी. तसेच लोंबकळणाऱ्या वीज वाहिन्या बदलण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२८-०६-२०२१) :** (१) आष्टी, पाटोदा व शिरुर (कासार) तालुक्यातील (जि.बीड) काही गावांतील विद्युत पुरवठा करण्यासाठी असलेल्या विद्युत प्रणालीतील काही विद्युत वाहिन्या जुन्या आहेत. आष्टी, पाटोदा व शिरुर उप विभागात जानेवारी, २०२० ते जून, २०२० या कालावधीमध्ये एकूण ०७ मानवी व एका प्राण्यास प्राणांतिक अपघात झाला आहे. तसचे एकूण ०३ मानवी अप्राणांतिक अपघात झाले आहेत.

(२) हे खरे नाही. वीज ग्राहकांना विद्युत पुरवठा करण्यासाठी असलेल्या विद्युत प्रणालीतील काही विद्युत वाहिन्या जुन्या असल्यामुळे त्यांची नियमितपणे देखभाल व दुरुस्ती करण्यात येते. लोंबकळणाऱ्या वीज वाहिन्या आढळल्यास किंवा त्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास त्याची तातडीचे दखल घेण्यात येऊन देखभाल दुरुस्ती करण्यात येते वा बदलण्यात येतात.

(३) बीड विभागांतर्गत आष्टी, पाटोदा, शिरुर (कासार) उप विभागात, जुने डी.पी. तसेच लोंबकळणाऱ्या वीज वाहिन्या बदलण्याकरीता विविध योजनेंतर्गत कामे करण्यात आली आहेत.

विद्युत प्रणालीची नियमितपणे देखभाल व दुरुस्तीकरीता एम्पॅनलमेंटव्दारे ३ वर्षाकरीता आष्टी उप विभागात ५, पाटोदा उप विभागात ७ तसेच, शिरुर (कासार) उप विभागात ५ कंत्राटदारांना निविदा देण्यात आल्या आहेत. या एजन्सीमार्फत आष्टी, पाटोदा, शिरुर (कासार) उप विभागात लघुदाब वाहिनीच्या २११ पोलमधील तारा ओढून १८५ पोल सरळ केले आहेत. उच्चदाब वाहिनीच्या ९९५ पोलमधील तारा ओढून ८७३ पोल सरळ केले आहेत. तसेच पोलमधील अंतर कमी करण्यासाठी नवीन १६१ पोल उभे करण्यात आले आहेत.

तसेच पं. दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेंतर्गत मार्च, २०१७ मध्ये आष्टी, पाटोदा, शिरुर (कासार) उप विभागात अनुक्रमे १७९, ९ व १८२ असे उच्चदाब व लघुदाब वाहिनीचे एकूण ३७० गंजलेले पोल बदलण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकणातील नाणार रिफायनरी प्रकल्पाला स्थानिकांचाही विरोध असल्याबाबत

**(२६) ४२१७ (१४-०९-२०२०) श्री.रमेशदादा पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४६६२५ ला दिनांक २८ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील नाणार रिफायनरी प्रकल्प रायगड जिल्ह्यात स्थलांतरित करणार असल्याचे मा.मुख्यमंत्री यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०१९ च्या विधानसभा सभागृहात लेखी उत्तराव्दारे घोषित केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हा हा पूर्वीपासूनच निसर्गसंपन्न असून नाणार रिफायनरी प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे तेथील निसर्ग नष्ट होईल त्यामुळे सदर प्रकल्पाऐवजी रायगड जिल्ह्यात एज्युकेशन हब आय.टी. सेंटर, शिपिंग कॉर्पोरेशन प्रकल्प आणि पर्यटन निर्माण करून सुशिक्षित बेकारांना नोकऱ्या व अशाप्रकारच्या विविध सुविधा मिळवून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (१४-०७-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

नाणार रिफायनरी प्रकल्प रायगड वा रत्नागिरी जिल्ह्यात उभारणीबाबत शासनापुढे कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ओरंगाबाद जिल्ह्यातील बालगृहांना लॉकडाऊनमध्ये धान्य पुरवठा करण्याबाबत

**(२७) ४२२३ (१७-०७-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यात अनाथ, काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांच्या १६ बालगृहांमध्ये ६५० पेक्षा जास्त मुले मुली प्रवेक्षित असून

यापुर्वीच शासनाने या बालगृहांचे सहाय्यक अनुदान रोखले असल्याने मागील एक वर्षांपासून बालगृहांचा धान्य पुरवठा बंद केल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार देशव्यापी लॉकडाऊनमध्ये या बालगृहांना धान्य पुरवठा करण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (१३-०१-२०२१) :** (१) व (२) औरंगाबाद जिल्हयात शासकीय व शासन अनुदानित कल्याणकारी संस्था १५१ असून त्याकरीता शासनाकडून दिनांक २१/०५/२०२० च्या पत्रान्वये माहे एप्रिल, २०२० ते सप्टेंबर, २०२० करीता नियतन उपलब्ध करून देण्यात आले आहे. औरंगाबाद जिल्हयातील बालगृहांपैकी ६ बालगृहांना त्यांच्या मागणीनुसार ४०.९४ क्विंटल गहू व २७.०१ क्विंटल तांदूळ क्षेत्रिय कार्यालयाकडून वितरित करण्यात आला आहे. उर्वरीत बालगृहांकडून लॉकडाऊनमुळे अन्नधान्याची मागणी क्षेत्रिय कार्यालयाकडे नोंदविण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद तालुक्यात सटाणा गावा जवळ रेल्वे अपघात झाल्याबाबत

**(२८) ४२२९ (१५-०७-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद पासून २५ कि.मी. अंतरावर असलेल्या सटाणा गावाजवळ रेल्वे अपघातात १६ मजुरांचा दुर्देवी अंत झाल्याची घटना माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हे १६ मजुर जालना जिल्हयातील चंदनझिरा येथील एसआरजे स्टीलच्या कंपनीत मागील पाच वर्षांपासून कार्यरत असल्याने मजुरांनी

लॉकडाऊनमुळे कंपनी मालकास वेतनाची मागणी केली परंतु कंपनी मालकाने या मजुरांचे वेतन न दिल्याने त्यांनी गावी जाण्याचा निर्णय घेतला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मजूरांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने संबंधित कंपनी मालकावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२४-०७-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदरहू कामगार कंपनीत कामाकरीता माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये आले होते. लॉकडाऊनमुळे कंपनी मालक वेतन देत नसल्याने मजुरांनी गावी जाण्याचा निर्णय घेतला ही बाब खरी नसून कंपनी मालकाने माहे एप्रिल, २०२० या महिन्याचे वेतन कंत्राटदारास दिनांक ०५/०५/२०२० रोजी दिले होते. कंत्राटदाराने सदरचे वेतन मे महिन्याच्या ०७ तारखेस कामगारांना देण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे बँकेचा प्रॉब्लेम झाल्याने सदरचे वेतन दिनांक ०८/०५/२०२० रोजी कंत्राटदार मजुरांना अदा करणार होते. तथापि, सदर कामगार हे दिनांक ०७/०५/२०२० रोजीच कोणालाही न कळवता विना परवानगी गावी जाण्यासाठी निघून गेले व दिनांक ०८/०५/२०२० रोजी त्यांचा रेल्वे अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला.

(३) अपघाताची चौकशी करण्याकरीता जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठित केली असून, समितीचा अहवाल अद्याप प्रलंबित असल्याने सद्यःस्थितीत कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद शहरात सरासरी वीज बील भरुनही वाढीव बिले आल्याबाबात

**(२९) ४२३६ (१७-०७-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात महावितरणने मार्च-एप्रिल, २०२० चे वीज बील सरासरीनुसार दिल्याने अनेक ग्राहकांनी हे बील ऑनलाईन भरले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्राहकांनी सरासरी बिले भरुनही महावितरणने वाढीव बिले दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२६-०७-२०२१) :** (१) हे खरे आहे. कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार ग्राहकांच्या मिटरचे प्रत्यक्ष जागेवर जाऊन मीटर वाचन व वीज बिल वितरण न करण्यास महावितरणला आदेश दिलेले होते. याबाबत self reading च्या सुविधेसह व्यापक जनजागृती करण्यात आली होती. ज्यांनी self reading च्या सुविधेचा लाभ घेतलेल्या ग्राहकांला रिडिंगनुसार, तर सुविधेचा लाभ घेतला नाही अश्या ग्राहकांना लॉकडाऊन काळात सरासरी वीज वापरानुसार बिलिंग करण्यात आले आहे. औरंगाबाद शहर अंतर्गत ३.१९ लाख लघुदाब ग्राहक असून मार्च, २०२० चे वीज देयक एप्रिल, २०२० मध्ये एकूण ५५ हजार ग्राहकांनी रुपये ९.३६ कोटी व एप्रिल, २०२० चे वीज देयक मे, २०२० मध्ये एकूण ६७ हजार ग्राहकांनी रुपये १३.९६ कोटी रक्कम ऑनलाईनव्दारे भरणा केलेली आहे.

(२) हे खरे नाही. माहे जून/जुलै, २०२० मध्ये ज्या ग्राहकांचे मीटर रिडींग प्राप्त झालेली आहे अशा ग्राहकांना त्यांच्या देयकामधून सरासरीप्रमाणे देण्यात आलेल्या वीज देयकाची रक्कम समायोजित करुन वापरलेल्या युनिट नुसार अचूक वीज देयके देण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यात कोरोना आपात्काल दरम्यान धान्य वाटपात गैरप्रकार झाल्याबाबत

**(३०) ४२७५ (१७-०७-२०२०) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना आपात्काल दरम्यान परभणी जिल्ह्यातील गोरगरीब व गरजू नागरीकांना विविध योजनेतून वाटप करण्यात येणाऱ्या गहू, तांदूळ व इतर धान्य वाटपात झालेल्या गैरप्रकाराची चौकशी करण्यात यावी अशी मागणी परभणी येथील लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते यांनी जिल्हाधिकारी, परभणी तसेच प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग यांच्याकडे सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात वाटपासाठी आलेले एकूण धान्य तसेच प्रत्यक्षात शिधापत्रिकेवर नोंदवून वितरित करण्यात आलेले धान्य यात तफावत असल्याने त्या सर्व धान्य वाटप प्रक्रिया, यंत्रणा यांची प्रत्यक्षात मंत्रालयस्तरावरील विशेष दक्षता व भरारी पथक यांच्यामार्फत गावनिहाय, मुद्देनिहाय चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धान्य वाटपातील गैरप्रकार व अनियमितता याप्रकरणी संबंधित जबाबदार अधिकारी, कर्मचारी, दुकानदार व इतर यंत्रणा यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबत तालुकानिहाय सविस्तर माहिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (०१-०७-२०२१) :** (१) होय, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व शिधापत्रिका लाभार्थी यांनी जिल्हाधिकारी परभणी, जिल्हा पुरवठा अधिकारी परभणी व तहसिलदार यांच्याकडे रास्त भाव दुकानदारांविरुध्द कोरोना आपात्कालीन परिस्थितीदरम्यान सन २०२० मध्ये निवेदने प्राप्त आहेत.

(२) शासन परिपत्रक दिनांक १२/०१/२०१२ अन्वये रास्त भाव दुकानांच्या प्रत्येक सहामाही कालावधीत किमान एक व वर्षात किमान दोन तपासण्या करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे, शासन पत्र दिनांक २४/०४/२०२० अन्वये रास्त भाव दुकानदारांबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निरसन करण्यासाठी जिल्हास्तरावर भरारी पथके स्थापन करुन त्यामार्फत ४८ तासात प्राप्त तक्रारींची तपासणी करुन आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी, उपआयुक्त (पुरवठा) व नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

धान्य वाटपाचे अनुषंगाने प्राप्त तक्रारीची चौकशी नायब तहसिलदार, तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांनी केली आहे.

(३)

| अ.क्र. | तालुका | प्राप्त तक्रारी | रा.भा.दु यांच्यावर केलेली कारवाई | |
|---|---|---|---|---|
| | | | निलंबित | अनामत रक्कम जप्त |
| १ | परभणी | ० | ० | ० |
| २ | जिंतूर | ४ | २ | २ |
| ३ | सेलू | १ | ० | १ |
| ४ | पाथरी | १ | १ | ० |
| ५ | मानवत | ० | ० | ० |
| ६ | सोनपेठ | २ | १ | १ |
| ७ | गंगाखेड | ७ | १ | ६ |
| ८ | पालम | ० | ० | ० |
| ९ | पुर्णा | १ | ० | १ |
| | एकूण | १६ | ५ | ११ |

दोषी आढळून आलेल्या रास्त भाव दुकानदारांविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात आलेली आहे.

अधिकारी, कर्मचारी यांच्याविरुध्द कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ नियामकांकडून परीक्षकांकरीता नियोजन करण्याबाबत

**(३१) ४३२९ (१५-०७-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व ठाणे रेड झोनमध्ये असल्याने नगरपालिका, महानगरपालिका यांच्यामध्ये पूर्व/पश्चिम आवश्यकतेनुसार शाळांची स्वीकृती केंद्र म्हणून व्यवस्था करून त्या परिसरातील परीक्षकांना जवळील सेंटरला तपासलेली उत्तरपत्रिका जमा करण्यास सांगितल्यास वेळ व खर्चाची बचत होण्याबाबत विभागाकडून आदेश निर्गमित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांचे आरोग्य व कोविड-१९ चा धोका लक्षात घेता बोर्ड नियामकांकडून पेपर जमा करणार असून त्याच धर्तीवर परीक्षकांकरीता नियोजन करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने दिनांक ८ मे, २०२० रोजी सचिव, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नवी मुंबई यांना निवेदन देऊन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२४-०८-२०२१) :** (१) नाही. तथापि, नियांमकाकडून उत्तरपत्रिका संकलनासाठी मुंबई विभागीय मंडळाकडून संकलन केंद्र व कालावधी निश्चित करण्यात आला होता.

(२) होय.
(३) परीक्षकांची जास्त संख्या विचारात घेता, मुंबई विभागीय मंडळाने निश्चित केलेल्या केंद्रावर नियामकांकडून उत्तरपत्रिका संकलित करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आणि वर्ग तुकड्यांवरील शाळांना अनुदानाचा वाढीव टप्पा देणेबाबत

**(३२) ४३५३ (१७-०७-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.कपिल पाटील** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आणि वर्ग तुकड्यांवरील शिक्षक कर्मचाऱ्यांना दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ नुसार २० टक्के वेतन अनुदान देण्यात येत असून दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शालेय शिक्षण विभागाने काढलेल्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व २०% अनुदान पात्र सर्व शाळा, वर्ग व तुकड्या व ज्यांना २०% अनुदान सुरू असलेल्या शाळा, वर्ग व तुकड्यांना पुढील ४०% चा पुढील टप्पा अनुदान मंजूर असून अनुदानास पात्र सर्व शाळा, वर्ग तुकड्या व कनिष्ठ महाविद्यालयांना दिनांक ०१ एप्रिल, २०१९ पासून अनुदानाचा वाढीव टप्पा देणेबाबत शासनाने आर्थिक तरतूद करुन शिक्षक-कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, २० टक्के अनुदान घेत असलेल्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पुढील अनुदानाचा वाढीव टप्पा न मिळाल्याने वाढीव टप्पा देणेबाबत मागणी केली असून अनुदानासाठी मुल्यांकनाचे निकष पूर्ण केलेल्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालय व सन २०१२-२०१३ च्या वर्ग तुकड्यांना अनुदानास पात्र म्हणून घोषित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) तसेच, राज्यात मागील १५ वर्षापासून अनुदानित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयामधील विनाअनुदानित शाळा व तुकड्यांवर काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनुदान देण्याबाबत सभागृहात घोषणा करण्यात आली असून अनुदान मंजूर असून देखील अनुदान वितरणाचा आदेश न निघाल्यामुळे जवळपास ४५ हजार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वेतनापासून वंचित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनुदान पात्र घोषित शाळांमधील वर्ग तुकड्यांना तसेच उच्च माध्यमिक शाळांमधील नैसर्गिक वाढीच्या वर्ग तुकड्यांना वेतन अनुदान वितरित करण्यात आले नसल्याने याप्रकरणी नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.शालेय शिक्षण मंत्री व मा.वित्त मंत्री यांना दिनांक ०४/०४/२०२०, ०६/०४/२०२० आणि १९/०४/२०२० रोजी निवेदन पाठवून तात्काळ वेतन अनुदान वितरित करण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळा व तुकड्यांना पुढील अनुदानाचा वाढीव टप्पा देवून वेतन अनुदानाअभावी उपासमारीची वेळ आलेल्या शिक्षकांना आश्वासनानुसार वेतन अनुदान वितरित करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२४-०८-२०२१)** : (१), (२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ मधील काही अटी ह्या जाचक असल्याने विविध संघटना व शिक्षक प्रतिनिधी यांनी सदर अटी रद्द कराव्यात, अशी विनंती शासनास केली आहे. यानुषंगाने मा.मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली गठित त्रुटी समितीच्या शिफारशी दिनांक १४/१०/२०२० रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत ठेवून, शासन निर्णय, दिनांक १३/९/२०१९ मधील काही अटी व शर्तीमध्ये शासन निर्णय, दिनांक ४/१२/२०२० अन्वये सुधारणा करण्यात आली.

त्यानुसार, पात्र शाळांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात येऊन, तपासणीत पात्र ठरलेल्या शाळांना दिनांक १२ फेब्रुवारी, २०२१ व १५ फेब्रुवारी, २०२१ अन्वये खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना

अनुदानास पात्र घोषित करुन, दिनांक १ नोव्हेंबर, २०२० पासून वाढीव २० टक्के अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

तसेच, शासन निर्णय, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२१ अन्वये २० टक्के अनुदानासाठी पात्र घोषित करण्यात आलेल्या मुंबई व कोल्हापूर विभागातील कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

सन २०१२-१३ च्या वर्ग तुकड्यांना अनुदानास पात्र ठरविण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त (शिक्षण) यांचेकडून मागविण्यात आला आहे. याबाबतचा निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अपंग शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करणेबाबत

**(३३) ४४३९ (१४-०९-२०२०) श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे : तारांकित प्रश्न क्रमांक ९८९ ला दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व प्रकारच्या शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना २४ वर्षानंतरची वरिष्ठ वेतनश्रेणी दिली जाते परंतु अपंग शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना २४ वर्षानंतरची वरिष्ठ वेतनश्रेणी लागू केली जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपंग शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना २४ वर्षानंतर वरिष्ठ वेतनश्रेणी देण्यासाठी शासन विचाराधीन आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१२-०७-२०२१) :** (१) होय.
(२) व (३) नाही.

अपंग शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासन निर्णय, दिनांक १३/०८/२००९ अन्वये १२ वर्षानंतर देण्यात येणारी कालबध्द पदोन्नती योजना लागू करण्यात आलेली आहे, परंतु सदरहू कर्मचाऱ्यांना २४ वर्षाच्या वेतनश्रेणीचा लाभ देण्याची कोणतीही तरतूद केलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अनुदानास पात्र झालेल्या शाळांचा निधी वितरणाचा शासन आदेश निर्गमित करणेबाबत

**(३४) ४४४१ (१७-०७-२०२०) श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खाजगी व्यवस्थापनाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजी अनुदानास पात्र म्हणून घोषित करण्यात आल्या असून सदर शाळांच्या अनुदानासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची तरतूद अर्थसंकल्पीय अधिवेशनात करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अनुदान वितरणाचा शासन आदेश निर्गमित न झाल्याने हे शिक्षक अजूनही वेतनापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच राज्यातील खाजगी व्यवस्थापनाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा वर्ग व तुकड्यांना अनुदान मिळण्यासाठी मुल्यांकन असून सदर मुल्यांकन केलेल्या शाळा व वर्ग तुकड्या क्षेत्रियस्तरावर तसेच मंत्रालयस्तरावर अनुदानास पात्र होण्यासाठी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पात्र शाळांच्या अनुदान वितरणाचा शासन आदेश निर्गमित करणेबाबत तसेच खाजगी व्यवस्थापनाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्यांना अनुदानास पात्र म्हणून घोषित करून अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२४-०८-२०२१) :** (१) व (२) होय.

सदर शासन निर्णयातील अटी ह्या जाचक असल्याचे विविध संघटना व शिक्षक प्रतिनिधी यांनी निदर्शनास आणून, सदर अटी रद्द कराव्यात अशी विनंती मा.मुख्यमंत्री/मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे केली.

त्यानुषंगाने, मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त त्रुटी समितीने सादर केलेला अहवाल पुढील मंत्रिमंडळ बैठकीत ठेवून, शासन निर्णयातील काही अटी व शर्तीमध्ये सुधारणा करण्यात आली.

त्यानुसार, पात्र शाळांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात येऊन, तपासणीत पात्र ठरलेल्या शाळांना दिनांक १२ व १५ फेब्रुवारी, २०२१ अन्वये अनुदानास पात्र घोषित करुन, निधी उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

तसेच शासन निर्णय, दिनांक २४/२/२०२१ नुसार मुंबई व कोल्हापूर विभागातील उच्च माध्यमिक शाळांना अनुदानास पात्र घोषित करण्यात आले आहे. सदर शाळांना अनुदान मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) हे खरे नाही. आयुक्त (शिक्षण) यांचेकडून अनुदानास पात्र घोषित करण्यासाठी प्राप्त झालेले प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे प्रस्ताव वित्त विभागाने दिलेल्या विहित नमुन्यात सादर करण्याबाबत आयुक्त (शिक्षण) यांना सुचित केले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना वेतन अदा करण्याबाबत

**(३५) ४४९६ (०९-०९-२०२०) श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील २२५०० शिक्षक मागील दोन दशकापासून विनामोबदला प्राध्यापकी सेवा करीत असून मुल्यांकन होऊन २०% अनुदान देण्याचे शासन निर्णय निर्गमित झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शासन निर्णयास अधीन राहून शिक्षकांना वेतन अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२४-०८-२०२१) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
अनुदानास पात्र घोषित केलेल्या व कागदपत्र तपासणीत पात्र ठरलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांना शासन निर्णय, दिनांक १५/२/२०२१ अन्वये २० टक्के अनुदानासाठी पात्र घोषित करुन, दिनांक १ नोव्हेंबर, २०२० पासून अनुदान मंजूर केले आहे.
तसेच, शासन निर्णय, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२१ अन्वये २० टक्के अनुदानासाठी पात्र घोषित करण्यात आलेल्या मुंबई व कोल्हापूर विभागातील कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळास आर्थिक सहाय्य करण्याबाबत

**(३६) ४६०१ (१७-०७-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोना आणि टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर राज्यांतर्गत बंद असलेली वाहतूक, घटलेले उत्पन्न यामुळे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ आर्थिक संकटात सापडले असून सद्य:स्थितीत महामंडळाचे कर्मचारी व अधिकारी यांच्या दरमहा वेतनाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील तीन महिन्यापासून राज्य शासनाकडून सवलतीच्या मुल्यापोटी मिळणाऱ्या रक्कमेतूनच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचारी व अधिकारी यांचे दरमहा वेतन अदा केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळास आर्थिक संकटात मदत करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (११-०८-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) होय, सवलत मुल्याची अग्रिम रक्कम शासनाने प्रलंबित वेतन व देणी अदा करण्यासाठी राज्य परिवहन महामंडळास दिलेली आहे.

कोविड-१९ च्या फैलावामुळे राज्यामध्ये लॉकडाऊन जाहीर झाल्याने, राज्य परिवहन महामंडळाची अत्यावश्यक सेवा वगळता बहुतांशी वाहतूक व्यवस्था बंद असल्याने, महामंडळास विशेष अर्थसहाय्य करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याच्या नवीन वीज धोरणाबाबत

**(३७) ४६७६ (१४-०९-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणारे ग्राहक, उद्योगांना स्वस्त दरात वीज पुरवठा तसेच वीज उत्पादनाचे खर्चात कपात नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन महावितरण, महापारेषण व महानिर्मिती कंपन्यांचा देखभाल दुरुस्ती खर्च कमी करणे, कृषी ग्राहकांना दिवसा वीज उपलब्ध करुन देणे त्याचबरोबर राज्यात मोठ्या प्रमाणात सौर ऊर्जा निर्मिती करणे यासंदर्भात शासनाने नवीन वीज धोरण ठरविण्याबाबत दिनांक २२ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास सदस्यांची समिती स्थापन करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तीन आठवड्याच्या विहित मुदतीनंतर म्हणजेच माहे मे, २०२० च्या तिसऱ्या आठवड्यात समिती अहवाल शासनास सादर होऊ न शकल्यामुळे शासनाने या समितीस १ महिन्याची मुदतवाढ दिल्याचे दिनांक २३ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तृत समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय, असल्यास, केव्हा,
(४) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२६-०७-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) वीज धोरण ठरविण्याबाबत शासन निर्णय, दिनांक २२ एप्रिल, २०२० नुसार शासन निर्णयातील विविध मुद्यांच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## नागपूर येथील कोराडी औष्णिक केंद्राचे विस्तारीकरण व अन्य ठिकाणी सुपर क्रिटीकल युनिटची उभारणी करणेबाबत

**(३८) ४६८० (१४-०९-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील कोराडी औष्णिक केंद्राचे विस्तारीकरण रुपये ९ हजार कोटी खर्चाचा प्रकल्प तसेच राज्यातील अन्य ठिकाणी सुपर क्रिटीकल युनिटची उभारणी करण्याबाबतचा निर्णय शासनाने दोन वर्षापूर्वी घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कोराडी औष्णिक केंद्र प्रकल्प व अन्य ठिकाणी सुपर क्रिटीकल टेक्नॉलॉजी युनिट उभारणीस स्थगिती देण्याबाबतचा निर्णय दिनांक ३ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील विजेची वाढती मागणी तसेच गुजरात राज्याकडून माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान अतिरिक्त वीज घेण्याची आलेली पाळी लक्षात घेता सदर प्रकल्प पुन:श्च उभारणीबाबत शासनाने फेरविचाराअंती तसाच निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोराडी औष्णिक केंद्राचे विस्तारीकरण तसेच राज्यातील अन्य ठिकाणी सुपर क्रिटीकल युनिटची उभारणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२६-११-२०२०) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) कोराडी, ता.कामठी, जि.नागपूर येथे ६६० मे.वॅ. चे २ सुपर क्रिटीकल संच उभारण्यासाठी शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.४७/ऊर्जा-४, दिनांक ०७ मार्च, २०१९ अन्वये, महाराष्ट्र शासनाने तत्वत: मान्यता दिली आहे.

दिनांक ०२/०६/२०२० च्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये "कोराडी औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या अनुषंगाने अपारंपारिक ऊर्जेचे विहित उद्दीष्टे (RPO Obligation), त्याची प्रति युनिट किंमत, शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्याबाबत असलेले प्राधान्य, अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांवर अधिक भर देणे या बाबी विचारात घेऊन सदर प्रकल्प पुढे चालू ठेवणे व येत्या ५ वर्षात नवीन औष्णिक विद्युत प्रकल्प न राबविण्याबाबतचे धोरण मंत्रिमंडळास सादर करावे" असा निर्णय घेण्यात आला आहे. सदर निर्णयानुसार शासनाच्या दिनांक १७/०६/२०२० च्या पत्रान्वये, याबाबतचा सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सूचना महानिर्मिती कंपनीस देण्यात आल्या आहेत.

---

## मु.पो.पिलवली तर्फे वेळंब (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या गावातील बौध्दवाडीत जादा दाबाचा वीज पुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३९) ४७४६ (१४-०९-२०२०) डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.पिलवली तर्फे वेळंब (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या गावातील बौध्दवाडीत कमी दाबाचा विद्युत पुरवठा पुरविण्यात येत असल्यामुळे ग्रामस्थांना मंद प्रकाशात जीवन व्यतित करावे लागत आहे, तसेच कमी

दाबाच्या वीज पुरवठ्यामुळे कृषीपंप, पाण्याचे मोटार पंप, घरगंटी यासारखे अनेक वीज उपकरणे सुरु होत नसल्याने ग्रामस्थ त्रस्त झाल्याचे माहे मे-जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावात जास्त दाबाचा वीज पुरवठा करण्याकरीता ३-फेज लाईन आणि ट्रान्सफार्मर बसवून देण्याची मागणी बौध्दजन विकास संस्था. मौजे पातेपिलवली, मुंबई यांनी दिनांक १८ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास ग्रामपंचायत, पिलवली तर्फे वेळंब, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी यांचकडे दिनांक २४ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुख्य कार्यालय सावर्डे यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पिलवली तर्फे वेळंब (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या गावातील बौध्दवाडीत जादा दाबाचा वीज पुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२६-०७-२०२१) :** (१) हे खरे आहे.

मौजे पिलवली तर्फे वेळंब (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या गावातील बौध्दवाडीत कमी दाबाचा विद्युत पुरवठा होत असल्याबद्दलची तक्रार महावितरणला प्राप्त झाली होती. सदर ठिकाणाची पाहाणी महावितरण कंपनीमार्फत करण्यात आली. सदर बौध्दवाडीमध्ये एकूण घरगुती २५ ग्राहक असून सदर ग्राहकांना विद्युत पुरवठा करणाऱ्या वाहिनीची लांबी ही १.५ कि.मी. आहे. त्यामुळे रोहित्रापासून वाहिनीच्या अंतिम भागात असणाऱ्या ग्राहकांना विद्युत पुरवठा कमी दाबाने होत असल्याचे निदर्शनास आले.
(२) हे खरे आहे.
(३) सदर गावातील कमी दाबाच्या विद्युत पुरवठ्याची तक्रार दूर करण्यासाठी लघुदाब वाहिनीच्या एकूण दहा गाळयाचे सिंगल फेज दोन वायरचे रुपांतर थ्री फेज चार वायर मध्ये करुन काम पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे मु.पो. पिलवली तर्फे वेळंब, बौध्दवाडी येथील ग्रामस्थांच्या कमी दाबाचा विद्युत पुरवठा होत असल्याच्या तक्रारीचे निवारण झाले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकणात स्वच्छता अभियान योजनेंतर्गत सार्वजनिक शौचालय बांधण्याबाबत

**(४०) ३३१९२ (१०-०८-२०१७) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वच्छता अभियान योजनेंतर्गत रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे, पालघर या जिल्ह्यात समुद्रकिनारी स्थानिक स्वराज्य संस्थेला सागरी नियमन क्षेत्रामध्ये पर्यटक व नागरिकांसाठी सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करावयाचे असल्यास स्थानिक स्वराज्य संस्थेच्या व्यतिरिक्त शासनस्तरावर अडचणी निर्माण होतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पर्यटक व नागरिकांना शासनाच्या धोरणानुसार मूलभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी शासनस्तरावर स्थानिक स्वराज्य संस्थांना मान्यता देण्याबाबत तसेच शौचालय बांधकाम करण्यास परवानगी नाकारल्यास नागरीकांच्या व पर्यटकांच्या होणाऱ्या गैरसोईबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (१५-०२-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल, नवी दिल्ली यांनी दिनांक ०६/०१/२०११ रोजी जारी केलेल्या सी.आर.झेड. अधिसूचना, २०११ मधील तरतुदींनुसार सी.आर.झेड. १ व सी.आर.झेड. ३ वर्गवारीमध्ये येणाऱ्या सार्वजनिक शौचालयाच्या बांधकाम अनुज्ञेय असून त्यासाठी महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाची (MCZMA) ची पुर्व परवानगी आवश्यक आहे. तसेच, महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाच्या दिनांक १९/१२/२०१५ रोजीच्या १०९ व्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, सी.आर.झेड. २ वर्गवारीमध्ये येणाऱ्या सार्वजनिक शौचालयाच्या बांधकामास स्थानिक नियोजन प्राधिकरण परवानगी देऊ शकते. तसेच, सी.आर.झेड. क्षेत्रातील

व्यक्तिगत शौचालयाच्या बांधकामास स्थानिक नियोजन प्राधिकरण परवानगी देऊ शकते. तसेच, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी दिनांक १८/०७/२०१६ अन्वये सी.आर.झेड. ग्राम पंचायतीमध्ये वैयक्तिक/सामुदायिक/ सार्वजनिक शौचालय बांधकामासाठी अनुदान देण्याबाबत नमुद केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकणातील नद्यांचे सर्व्हेक्षण करण्याबाबत

**(४१) ३५८३२ (०२-०१-२०१८) श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील नद्यांमध्ये कंपन्यामधील उत्सर्जित रंगद्रव्ये, सांडपाणी याचबरोबर प्लास्टिक, थर्माकोल टाकण्यात येत असल्याने नद्यांचे अस्तित्व धोक्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने नद्यांचे सर्व्हेक्षण केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (२६-०८-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कोणत्याही उद्योगास विनाप्रक्रिया सांडपाण्याचा विसर्ग करण्याची परवानगी देत नाही. तसेच कोकण किनारपट्टीतील औद्योगिक वसाहतींमध्ये उद्योगातून निर्मित होणाऱ्या सांडपाण्यावर पुर्नप्रक्रिया करण्यासाठी सामुहिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शाळा बंद करण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(४२) ४१४७१ (०१-०८-२०१८) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ३८८७५ ला दिनांक ९ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कमी पटसंख्या असलेल्या सुमारे १३१४ शाळा बंद करण्याचा निर्णय शासनाने माहे डिसेंबर, २०१७ व माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतला असून रायगड जिल्ह्यातील ४२ शाळा आतापर्यंत बंद झाल्या असून जिल्ह्यातील खाजगी आणि जिल्हा परिषदेच्या एकूण १०३ शाळा बंद होणार आहेत तर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अखत्यारित असलेल्या आतापर्यंत ५६८ शाळा बंद केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात मागील १५ वर्षात ८० हजार शासकीय शाळा बंद करुन त्यांची संख्या ३० हजारापर्यंत मर्यादित ठेवण्याबाबत शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव यांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान जाहीर केले, तसेच अशा शाळा बंद करण्याचा शासनाचा कोणताही विचार नाही असे मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी सांगून याची चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या उक्त निर्णयाचा परिणाम दुर्लक्षित असलेल्या आदिवासी पाड्यांमधील आदिवासी विद्यार्थ्यांवर होणार असल्याने आदिवासी पाड्यातील विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागणार असून शाळांतील विद्यार्थ्यांसाठी पर्यायी कोणती व्यवस्था केली आहे तसेच सदर शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यामागची कारणे काय आहेत, सदर निर्णयाबाबत शासन फेरविचार करणार आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद न करण्याबाबत तसेच शाळांतील विद्यार्थ्यांची पर्यायी व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२८-०७-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत असल्याबाबत

**(४३) ४२३९४ (०१-०८-२०१८) श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास : तारांकित प्रश्न क्रमांक ३२२३५ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थी संख्या गत १० वर्षापासून सतत कमी होत आहे तर इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या वाढत असून मराठी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थी संख्या घटण्याची व शाळा बंद पडण्याची कारणे काय आहेत,

(२) असल्यास, राज्यात मराठीतुन सर्व व्यवहार करण्याचे शासनाचे धोरण असताना इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मराठी विषय शिकविण्यास शासनाने सक्ती केली आहे काय, तसेच इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये इंग्रजी शिकविण्यासाठी इंग्रजी विषयाच्या शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठी माध्यमाच्या शाळांची संख्या वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२३-०७-२०२१) :** (१) इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मुलांना दाखल करण्याचा पालकांचा कल असल्याने इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या वाढत आहे.

(२) महाराष्ट्र राज्यातील सर्व परीक्षा मंडळाचे अभ्यासक्रम असलेल्या, सर्व माध्यमांच्या शासकीय व खाजगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमध्ये दिनांक ०१ जून, २०२० च्या शासन निर्णयान्वये इ.१ ली ते १० वी साठी मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गावर दुतर्फा संरक्षण भिंत उभारण्याबाबत

**(४४) ४६००७ (३०-११-२०१८) श्री.कपिल पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गावर दुतर्फा १४१० कि.मी. लांबीची संरक्षण भिंत उभारण्याचा प्रकल्प राबविण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू संरक्षण भिंत उभारण्याच्या प्रकल्पासाठी रुपये दहा हजार कोटी खर्च होणार असल्याचे तज्ञांनी मत मांडले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकल्पाचे स्वरुप काय आहे, त्यासाठी किती निधीचा आवश्यकता आहे, सदर निधी कशाप्रकारे उपलबध करण्यात येणार आहे, उक्त प्रकल्प राबविण्यामागील कोणते उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे, तसेच, सदर प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्यांचे कशाप्रकारे पुनर्वसन करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०८-२०२१) :** (१) होय.
रस्त्याच्या दुतर्फा ७०१ कि.मी. लांबीमध्ये (एकूण १४०२ कि.मी.) कुंपण भिंतीच्या कामाची तरतूद करण्यात आली आहे.

(२) नाही, प्रकल्पाच्या कामात कुपण भिंत उभारण्यासाठी रुपये १०३७.८५ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकल्प हा मूळ हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या बांधकामाचा भाग आहे, त्यामुळे स्वतंत्र निधी उभारण्याची आवश्यकता नाही.

प्रकल्पाच्या कामासाठी बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला अदा करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठ व अन्य विद्यापीठांसह युजीसीच्या यादीत नसलेल्या पदव्या दिल्या जात असल्याबाबत

**(४५) ४६७९६ (०५-०७-२०१९) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.प्रविण दरेकर, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठ व अन्य काही विद्यापीठांसह अनुदान आयोगाच्या सन २०१४ मधील राजपत्रित अधिसूचनेनुसार मान्यता नसलेल्या पदव्या दिल्या जात असल्याचे दिनांक ७ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोठ-मोठ्या पदव्यांची नावे सांगून विद्यार्थ्यांकडून पैसे घेण्याच्या महाविद्यालयांच्या नियमांना ही विद्यापीठे अप्रत्यक्ष पाठिंबा देत असल्याचा आरोप केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन युजीसीच्या यादीत नसलेल्या पदव्या देणाऱ्या महाविद्यालयांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२२-०७-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग कायदा, १९५६ मधील कलम २२ मध्ये नमुद केलेल्या मान्यताप्राप्त पदव्यांच्या नावाच्या यादीप्रमाणेच विद्यापीठांने नावे नमुद करणे आवश्यक आहे. बदलत्या शिक्षण पध्दतीचा वापर केल्यामुळे मुंबई विद्यापीठाने सक्षम प्राधिकरणाच्या संमतीने गरजाधिष्ठीत पदव्या तयार केल्या आहेत. तथापि, यातील काही पदव्यांची नावे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यताप्राप्त पदव्यांच्या नावाच्या यादीशी जुळत नसल्याचे दिसून येते. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यताप्राप्त पदव्यांच्या नावाच्या यादीनुसार अशा पदव्यांचे नाव बदलण्याचे तसेच काही पदव्यांची पुनर्रचना करण्याचे काम विद्यापीठाकडून सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## नांदेड येथे हदगांव ते पेवा बससेवा सुरु करण्याबाबत

**(४६) ४७२६० (०५-०७-२०१९) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हदगांव (जि.नांदेड) आगारातून सुटणारी हदगांव-पेवा ही बस दिनांक ४ जानेवारी, २०१९ रोजी पासून बंद असल्याने विद्यार्थी व प्रवाशांची तसेच वृत्तपत्रांचे पार्सल वेळेवर मिळत नसल्याने वाचक व दलालांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सदर गावाची बससेवा पुन्हा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (११-०८-२०२१) :** (१) हे खरे नाही.

राज्य परिवहन महामंडळाच्या नांदेड विभागातील हदगांव आगारामार्फत हदगांव ते पेवा मार्गावर सकाळी ०७.४५, १०.१५ व दुपारी १६.१५ वाजताच्या फेऱ्या नियमित चालविण्यात येत आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे उपकेंद्रात व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत

**(४७) ४७९१४ (०५-०७-२०१९) ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाकडून ठाणे येथील उपकेंद्रात कोणते अभ्यासक्रम चालविले जातात,

(२) असल्यास, उक्त अभ्यासक्रमांकरीत किती शिक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे,

(३) असल्यास, उक्त केंद्रात व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२२-०७-२०२१) :** (१) मुंबई विद्यापीठाच्या ठाणे येथील उपकेंद्रात बी.एम.एस., एम.बी.ए. पाच वर्ष एकात्मिक अभ्यासक्रम व बी.बी.ए., एल.एल.बी. पाच वर्ष एकात्मिक अभ्यासक्रम चालविले जातात.

(२) बी.एम.एस., एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी कायमस्वरुपी ४ शिक्षक, बी.बी.ए., एल.एल.बी. अभ्यासक्रमासाठी १ पूर्णवेळ अस्थायी शिक्षक व तासिका तत्वावर १५ शिक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे.

(३) ठाणे जिल्ह्यातील आणि शहरातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि प्रशासकीय सोई सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी मुंबई विद्यापीठाकडून ठाणे येथे उपकेंद्राची स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे सदर उपकेंद्रात व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाकडून एल.एल.एम.चे पेपर फेरतपासणी करुन विद्यार्थ्यांवरील अन्याय दूर करण्याबाबत

**(४८) ४८०२९ (०५-०७-२०१९) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाकडून एल.एल.एम.चे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ८२% विद्यार्थी पहिल्या सत्रामध्ये नापास झाल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नापास झालेल्या विद्यार्थ्यांकडून पेपर तपासणीत अनियमितता झाल्याचा आरोप केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यापीठाने विद्यार्थ्यांचे पेपर फेरतपासणी करुन त्यांच्यावरील अन्याय दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२२-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील अनेक महाविद्यालयांचे संलग्नता शुल्क प्रलंबित असल्याबाबत

**(४९) ४८०६० (०५-०७-२०१९) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अनेक महाविद्यालयांचे कोटयवधीचे संलग्नता शुल्क प्रलंबित असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून सदर संलग्नता शुल्क प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(२) असल्यास, सदर संलग्नता शुल्क प्रलंबित असल्याने मुंबई विद्यापीठाचा उत्पन्नाचा स्त्रोत बंद झाला असून उक्त संलग्नता शुल्क वसुल करण्याबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच किती महाविद्यालयाकडे संलग्नता शुल्क प्रलंबित आहे व किती महाविद्यालयाकडून संलग्नता शुल्क वसुल करण्यात आले आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२२-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

विद्यापीठाकडून महाविद्यालयांना संलग्नता देण्यासाठी संलग्नता शुल्क आकारले जाते. तथापि, मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत असणाऱ्या बऱ्याचशा महाविद्यालयांनी सदर संलग्नता शुल्क न भरल्यामुळे सदर शुल्क महाविद्यालयांकडे प्रलंबित आहे.
(२) महाविद्यालयांकडून संलग्नता शुल्क वसूल करण्याच्या अनुषंगाने प्रत्येक महाविद्यालयांकडे थकित शुल्क किती आहे, हे जाणून घेण्यासाठी मे.जाधव ॲण्ड कंपनी यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच आर्थिक वर्ष २०१७-२०१८ पासून महाविद्यालयाकडून विद्यापीठास देय असणाऱ्या शुल्काची रक्कम भरण्याची प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आली आहे. सदर प्रक्रियेमध्ये महाविद्यालय सुरू झाल्यानंतर त्यांच्याकडून कोणत्या प्रकारचे शुल्क आलेले नाही, याविषयी माहिती समजते. महाविद्यालयाकडून सदर बाबतीत रक्कम देण्यास टाळाटाळ होत असल्यास संबंधित महाविद्यालयांवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये कारवाई करण्यात येते.
(३) मे.जाधव ॲण्ड कंपनी यांनी दिलेल्या अहवालानुसार मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत असणाऱ्या एकूण ७७४ महाविद्यालयापैकी ३२७ महाविद्यालयांकडून रुपये ६१,६५,२८,३५६/- एवढे संलग्नता शुल्क येणे बाकी आहे. तर १०८ महाविद्यालयांकडून रुपये २,७२,६१,७७८.३५ एवढे संलग्नता शुल्क विद्यापीठाकडे जमा झालेले आहे. ऊर्वरीत ३३९ महाविद्यालयांच्या थकित शुल्क विषयांचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

## मुंबईतील प्रशासकीय गैरप्रकारांमुळे विविध दुर्घटना होत असल्याबाबत

**(५०) ४८६७२ (१०-०७-२०१९) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत गेल्या काही वर्षात प्रशासकीय गैरप्रकारांमुळे मुंबईकरांना जीव गमवावा लागला असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासकीय दुर्लक्षामुळे घडलेल्या दुर्घटना प्रकरणात एकाही दोषी अधिकाऱ्यास कारावासाची शिक्षा झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणे केवळ चौकशी, निलंबनासारख्या तत्कालीन कारवाया आणि खटल्यांच्या तारखांमध्येच प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-०७-२०२१) :** (१) माहे मार्च, २०१९ मध्ये मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकाबाहेरील हिमालय पूल पडण्याची दुर्घटना घडली असून, सदर दुर्घटनेत ७ व्यक्तींचा मृत्यू झाला असून, ३४ व्यक्ती जखमी झाल्या आहेत.

(२) व (३) सदर दुर्घटनेनंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असून, चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पोलिसांकडे नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने एक कार्यकारी अभियंता व एक सहायक अभियंता (पूल) या दोन अधिकाऱ्यांचे तात्काळ प्रभावाने निलंबन करण्यात आले.

तसेच, एक कार्यकारी अभियंता यांना दिनांक ०२/०४/२०१९ रोजी अटक करण्यात येऊन त्यांना पोलीस कोठडीमध्ये ठेवण्यात आले होते.

सदर प्रकरणी १ सहायक अभियंता, २ कार्यकारी अभियंता, १ तत्कालीन उपप्रमुख अभियंता (पूल) व १ तत्कालीन प्रमुख अभियंता (पूल) यांच्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ज्ञापन व दोषारोपपत्र बजावण्यात आले आहे.

(४) व (५) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २७ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये, छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकाबाहेरील हिमालय पूलाच्या दुर्घटनेची चौकशी करण्याकरीता उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

सदर उच्चस्तरीय समितीने तयार केलेला चौकशी अहवाल दिनांक २०/०७/२०१९ रोजी गोपनीय पत्राव्दारे मुख्यमंत्री सचिवालयास सादर करण्यात आला असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविले आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.